# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक ०५/०४/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०१ दु ११.३० वा.**

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.२२/०३/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि.२२/०३/२०१८ चे इतिवृत दुरूस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच कार्यालयाचे आस्थापनेवरील एल.जी.एस पदविका परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना अतिरीक्त एक वेतनवाढ देणेबाबत. | ठराव / निर्णय : - सदर प्रस्तावाचा मजकूर पाहता प्रभाग समिती - एच नवघर-माणिकपूर येथील कर्मचारी श्री. प्रशांत संखे (लिपीक), सौ. तेजस्वी संखे (लिपीक), श्रीमती प्रज्ञा सावंत (लिपीक) यांना त्यांच्या नियमित वेतन वाढीवर फरक न पडता त्यांना एक अतिरिक्त वेतनवाढ मंजूर करणे कामी ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडीक सूचक :- मा.श्री.वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३. | दिवाबत्ती साहित्य पुरवठा कामी सन २०१६-१७ वित्तीय वर्षातील मंजुर पुरवठादारास मुदतवाढ देणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पथदिव्यांमध्ये शासनाकडून एनर्जी एफिशिएंसी सर्विस लिमिटेड (EESL) च्या माध्यामातुन ऐस्को (ESCO) तत्वावर एल.ई.डी. (LED) दिवे बसविणे बाबतचे प्रकल्प राबविण्याची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील मंजूर दिवाबत्ती साहित्य पुरवठादारास माहे जुलै २०१८ पर्यंत मुदतवाढ देणेंस व येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री.कन्हैय्या भोईर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ४. | प्रभाग समिती - एफ, धानिव/पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा (पुर्व) वालईपाडा येथील जनार्दन स्मृती बंगला ते दामोदर पाटील यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉकचा रस्ता करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. ॲनायडा एंटरप्रायजेस यांची निविदा ४.९५% जास्त दराने ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणें ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५. | विरार (पू.) प्रभाग क्र.८ जिवदानी पाडा आंबेडकर नगर ते हिलपार्क सोसायटी पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे (नागरी | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा विषय क्र. १३, दि. १९/०८/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. नेवाळकर एंटरप्रायजेस ह्यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता |

| | | |
|---|---|---|
| | दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत) कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | प्रभाग क्र.६ मध्ये विरार (पू.) कातकरीपाडा येथे मातुल्य दुकानापासून ते पंचशील नगरपर्यंत पाईप गटार बनविणे. (नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत सन २०१४-१५) कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा विषय क्र. १८ दि. १८/०३/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. हिरालाल डी.सोनार ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ०.०४% कमी दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना.पाटील सूचक :- मा.श्री.अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग समिती, इतर कार्यालय यांना संगणक संच, यु.पी.एस, प्रिंटर व स्कॅनर तसेच इतर संगणकीय साहीत्य पुरविणे कामी GEM गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसच्या माध्यमातून ऑनलाईन निविदा प्रकियेद्वारे खरेदी करणेकामी मंजुर ई-निविदा धारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. (बीड नं. GEM/2018/B/40145) | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी लघुत्तम दराच्या निविदाकाराबरोबर संविदा करुन संगणक खरेदी करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. सखाराम महाडीक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग समिती, इतर कार्यालय यांना संगणक संच, यु.पी.एस, प्रिंटर व स्कॅनर तसेच इतर संगणकीय साहीत्य पुरविणे कामी GEM गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसच्या माध्यमातून ऑनलाईन निविदा प्रकियेद्वारे खरेदी करणेकामी मंजुर ई-निविदा धारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. (बीड नं. GEM/2018/B/40161) | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी लघुत्तम दराच्या निविदाकाराबरोबर संविदा करुन प्रिंटर खरेदी करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ९. | वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग समिती, इतर कार्यालय यांना संगणक संच, यु.पी.एस, प्रिंटर व स्कॅनर तसेच इतर संगणकीय साहीत्य पुरविणे कामी GEM गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसच्या माध्यमातून ऑनलाईन निविदा प्रकियेद्वारे खरेदी करणेकामी मंजुर ई-निविदा धारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. (बीड नं. GEM/2018/B/40226) | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी लघुत्तम दराच्या निविदाकाराबरोबर संविदा करुन संगणक खरेदी करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १०. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०६ नुसार सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल मा. स्थायी समिती सभेपुढे सादर करणेबाबत | ठराव :- लेखापरिक्षण विभागाने सादर केलेल्या वसई-विरार महानगरपालिका दि. १ एप्रिल, २०१५ ते दि. ३१ मार्च, २०१६ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवालास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ११. | प्रभाग समिती - एफ, धानिव/पेल्हार क्षेत्रातील कारगील येथे सार्वजनिक शौचालयाच्या बाजुला मुख्य नाल्यावर आर.सी.सी. पाईप बॉक्स कल्व्हर्ट बांधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. एच.व्ही. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने ही प्राप्त निविदामध्यो लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्रीम.दिक्षा घरत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १२. | सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरिता विरार प्रभाग समिती अे-बोळींज अंतर्गत विरार (पश्चिम)(तत्कालीन विरार नगरपरिषद क्षेत्र) येथील दैनंदिन बाजार फी वसुलीसाठी निविदा मागविणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा करण्यांत आली. माहे एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंत दैनंदिन बाजारपोटी वसुल होणारी अंदाजित रक्कम रु. २५,१९,९३०/- या वार्षिक रक्केवर १०% वाढ करुन रु. २७,७१,९३०/- इतकी होणाऱ्या रक्केवर १२ जी.एस.टी.करासह एकूण रु. ३१,०४,५६२/- धरुन सन २०१८/१९ वर्षाकरीता बाजार कर वसुली वार्षिक ठेका काढण्यासाठी जाहिर ई-निविदा प्रसिध्द करुन ठेका देण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्रीम.दिक्षा घरत<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका